# साहित्यरंग

भाग-३

# साहित्यरंग

भाग-३

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या
बी. ए. तृतीय वर्षासाठी (सत्र-५ व सत्र-६) आवश्यक मराठी विषयाचे पाठ्यपुस्तक


: संपादक मंडळ :

डॉ. रेखा वडिखाये
डॉ. प्रमोद मुनघाटे
डॉ. सत्यवान मेश्राम
डॉ. राजन जयस्वाल
डॉ. शैलेंद्र लेंडे
डॉ. दत्तात्रय वाटमोडे
डॉ. व्यंकटेश पोटफोडे
डॉ. राजेंद्र नाईकवाडे
डॉ. मिलिंद साठे
डॉ. सोपानदेव पिसे
डॉ. राकेश कभे
श्री. सचिन उपाध्याय



राघव

राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स
नागपूर | जबलपूर

साहित्यरंग (भाग-३) : संपादक मंडळ

Book 1

ISBN : 978-93-93673-09-1

प्रथमावृत्ती : २५ जुलै २०२२

© संपादक मंडळ

मूल्य : ₹ १२५.००

प्रकाशक :
राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स,
राजविलास टॉकीज जवळ,
महाल, नागपूर - ४४० ०३२
शाखा : जबलपूर


अक्षरजुळवणी व मुद्रक :
महालक्ष्मी ऑफसेट,
नागपूर

या संपादनात समाविष्ट पाठांमधून व कवितांमधून व्यक्त झालेली मते ही संबंधित लेखक व कवींची असून त्या त्या काळानुरूप नोंदवलेली आहेत. प्रस्तुत विद्यापीठ, मराठी भाषा अभ्यासमंडळ व प्रकाशक त्या मतांशी सहमत असतीलच असे नाही.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## मराठी भाषा अभ्यासमंडळ


- **डॉ. रेखा वडिखाये** (अध्यक्ष)
  मराठी विभाग, सी. पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, नागपूर
- **डॉ. प्रमोद मुनघाटे** (सदस्य)
  प्राध्यापक व पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख,
  राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
- **डॉ. शैलेंद्र लेंडे** (सदस्य)
  प्राध्यापक - पदव्युत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
- **डॉ. दत्तात्रय वाटमोडे** (सदस्य)
  मराठी विभागप्रमुख, शरदचंद्र कला, वाणिज्य महाविद्यालय, बुटीबोरी
- **डॉ. व्यंकटेश पोटफोडे** (सदस्य)
  मराठी विभागप्रमुख, श्रीमती राजकमल बाबुराव तिडके महाविद्यालय, मौदा
- **डॉ. राजेंद्र नाईकवाडे** (सदस्य)
  मराठी विभाग, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
- **डॉ. मिलिंद साठे** (सदस्य)
  मराठी विभागप्रमुख, स्व. डॉ. हरिभाऊ आदमने कला व वाणिज्य महाविद्यालय, सावनेर
- **डॉ. सोपानदेव पिसे** (सदस्य)
  मराठी विभाग, सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर
- **डॉ. राकेश कभे** (सदस्य)
  मराठी विभागप्रमुख, महात्मा गांधी महाविद्यालय, पारशिवनी
- **डॉ. सत्यवान मेश्राम** (सदस्य)
  निवृत्त प्राचार्य, महिला कला महाविद्यालय, उमरेड
- **डॉ. राजन जयस्वाल** (सदस्य)
  निवृत्त प्राध्यापक, गोविंदराव वारजुरकर महाविद्यालय, नागभीड
- **श्री. सचिन उपाध्याय** (सदस्य)



# मेघ-दवं

श्याम तारे

**मेघ-दंव**
**प्रथमवृत्ती** - ७ जानेवारी २०२३
ISBN : 978-93-92630-58-3
© श्याम तारे

**प्रकाशक**

**सौ. नम्रता मुळे**
**डिंपल पब्लिकेशन**
१०४, वायकिकी आपर्टमेंट, आनंदनगर,
नवघर, वसई रोड स्टेशन (प. रेल्वे), जि. पालघर - ४०१ २०२.
भ्रमणध्वनी - ९८२०७४८०८१, ९२२६९३७९२४

**मुंबई कार्यालय -**

४/१, कल्याण बिल्डिंग, चिकित्सक शाळेसमोर, खाडिलकर मार्ग,
गिरगाव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी - ०२२-२३८०३०१२
**E-mail** - dimplepublication@gmail.com
**Visit** -www.dimplepublication.com

**अक्षरजुळणी -**

आदिती ग्राफिक्स उद्यमवाडी, विष्णुनगर, ठाणे (प.) - ४००६०२.
भ्रमणध्वनी - ९८२१५१५०८३

**मुद्रक -**

प्रिंट वन ग्राफिक्स, नवी मुंबई.

**मुद्रितशोधन -**

सौ. ललिता आमोद कर्वे
भ्रमणध्वनी - ९७७३०१२०३६

**मुखपृष्ठ** - सतीश भावसार

**किंमत** - रु. २००

# जीवनधर्मी भावमधुर प्रणयगान

- डॉ. राजेंद्र नाईकवाडे


श्री. श्याम तारे यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह असला आणि त्यांच्या जीवनप्रवासाच्या उत्तरायणात तो प्रसिद्ध होत असला, तरी ते मराठीतील कुणी नवोदित वा हौशी असे कविलेखक आहेत असा गैरसमज कृपया वाचकांनी करून घेऊ नये. तारे यांच्या कविता आणि इतर साहित्य ७० च्या दशकापासून विविध मान्यताप्राप्त मराठी नियतकालिकांमधून प्रकाशित होत आले आहे. ८० च्या दशकापासून विविध मराठी दैनिकांतून त्यांनी सातत्याने स्तंभलेखन केले आहे. १९६३ ते २००२ अशा प्रदीर्घ कालखंडात त्यांनी राज्यशासनाच्या आणि भारत सरकारच्या महत्त्वपूर्ण खात्यात आपली सेवा प्रदान केली. भारत सरकारच्या 'श्रम मंत्रालया'तून 'डेप्युटी डायरेक्टर ऑफ ट्रेनिंग' या पदावरून निवृत्त झालेल्या श्यामजींना दृकश्राव्य माध्यमांसाठी विविध प्रकारचे कार्यक्रम तयार करण्याचा आणि तत्संबंधी संहितालेखनादि साहित्यिक घटकांचा दीर्घकालीन अनुभव आहे. दीर्घ काळ विविध विषयांवर स्तंभलेखन केल्याने मराठी माध्यमविश्व आणि साहित्यविश्व त्यांना चांगले ओळखते. मराठी साहित्यिकांच्या, पत्रकारांच्या आणि कलावंतांच्याही सहवासाने समृद्ध आणि संपन्न झालेले असे हे व्यक्तिमत्त्व आहे. नागपूर-विदर्भात आणि मुंबईत वास्तव्याला असलेल्या या अनुभवसंपन्न कवीला सुरेश भट यांच्यासारख्या अनेक श्रेष्ठ साहित्यिकांचाही सहवास लाभला. त्यांच्या काव्यातून या साऱ्या बहुश्रुत, बहुआयामी, अनुभवसमृद्ध, समावेशक आणि स्वागतशील जीवनप्रवासाचे पडसाद उमटताना दिसतात. त्यांची काव्यधारा अधिक संवेदनाशील आणि समाजशील घडण्यामागे हे त्यांचे बहुरंगी आणि बहुढंगी, उमदे आणि प्रगल्भ स्वीकारशील आणि समन्वयशील असे व्यासंगी व्यक्तिमत्त्व उभे आहे हे लक्षात यायला वेळ लागत नाही. खूप मागे म्हणजे जवळजवळ ७० च्या दशकात लिहिलेल्या कवितांपासून त्यांच्या ताज्या कवितांपर्यंत शे-दीडशे कविता माझ्या आवतीभोवती विखुरल्या आहेत. या कवितांमधून एक चिरतरुण, जीवनोत्सुक आणि सर्जनोत्सुक कविमन डोकावताना मी पाहतो, तेव्हा मला




या कवितांविषयी मनापासून काहीतरी बोलावेसे, सांगावेसे वाटते. तेच सांगण्याचा प्रयत्न आता इथे करायचा आहे.

## आनंदवादी जीवनदृष्टी

श्याम तारे यांचे व्यक्तिमत्त्व बालपणी कीर्तन-प्रवचनांच्या आध्यात्मिक आणि छंदोमयी काव्य परंपरेवर पोसले गेल्याचे त्यांच्या जीवनप्रवासावरून दिसते. त्यानंतर मात्र त्यांचा प्रवास अनेक शहरांत अनेक प्रकारच्या पर्यावरणात 'अस्थायीवर स्थायिक झालो' अशा प्रकारचा मुक्त, घुमन्तू प्रकारचा राहिला. त्यामुळे आवतीभोवतीच्या प्रत्येकच फुलातून मधुरस गोळा करणारे भृंगरूप कविमन जीवनात सामोरे येणारे सारे अनुभव समरसून घेत-घेत बहरताना दिसते. शिवाय श्यामजी यांची शासकीय सेवाही अशी की, जिचा संबंध दूरदर्शन या माध्यमाशी आणि त्या निमित्ताने कलाक्षेत्राशी जुळणारा! त्यामुळे विविध क्षेत्रीय साहित्यिक-अनुभवांनी समृद्ध झालेले हे कविमन आहे. श्यामजी यांच्या एकूणच काव्यसंभाराकडे दृष्टी टाकली, तर आवतीभोवतीच्या रंगीबेरंगी पर्यावरणातून परागकण गोळा करून त्याचे रूपांतर गोड अशा काव्यामधून करण्याची प्रवृत्ती केंद्रस्थानी दिसते. एक स्वागतशील, समन्वयशील आणि समावेशक असे हे कविमन आहे. त्याला जोडण्यात, जुळवण्यात, समजून घेण्यात आणि आत्मसात करण्यात रुची आहे. तोडण्यात, ताणण्यात आणि नाकारण्यात मात्र या मनाला अरुची आहे. जे काही वाट्याला आले; ते शांतपणे, संयमितपणे स्वीकारीत पुढे जाणे ही या व्यक्तिमत्त्वाची जीवनदृष्टी आहे. हीच त्यांची जीवननिष्ठाही आहे आणि हीच त्यांची कुटुंब आणि समाज या विषयाच्या बांधिलकीची कल्पना आहे. हा जीवनाकडे बघण्याचा एक भारतीय आनंदवादी दृष्टीकोन आहे. पुलंच्या 'रसिकहो-मित्रहो-श्रोतेहो' या तीन भाषणसंग्रहांना संयुक्तपणे प्रस्तावना लिहिताना कवयित्री शांताबाई शेळके यांनी पुलंच्या याच आनंदवादी जीवनदृष्टीचे आणि साहित्यदृष्टीचे यथार्थ विश्लेषण केले आहे. मराठीतील तांबे-नाघ भावगीत संप्रदायाच्या अंत:प्रवाहाचा मुख्य स्वरही असाच संस्कृतिसन्मुख, परंपरासमृद्ध आणि कुटुंब-समाजवत्सल असाच आहे. आकाशी उंच उडाया दे पंख भरारीचे/जीवनात स्वर घुमवाया दे





श्याम तारे हे एक ज्येष्ठ साहित्यिक. गेली कित्येक वर्षं विविध वाङ्मयप्रकारांमध्ये त्यांनी लेखन केलेलं आहे. कवितेसारख्या नाजूक आणि अति संवेदनशील प्रकारातही त्यांची लेखणी लीलया संचार करते. ईश्वरविषयक चिंतन आणि प्रेमभावनेचे विविध पापुद्रे त्यांची प्रतिभा सहज शब्दांकित करते. त्यांच्या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येते. ती प्राय: नादानुसारी असते. संगीत हा तिचा अंगभूत गुणधर्म असतो. अशा सांगीतिक रचना करण्यात त्यांचा हातखंडा आहे. म्हणून तिचं नातं गदिमांच्या रचनाशी दाखवता येईल.

माणसाला सुखाबरोबर अटळपणे येणाऱ्या दु:खाचा शाप आहे. त्याच्या आयुष्यात आनंदपर्वणी फार काळ राहत नाही. दिवस जातात. इतक्या दाट गडद भावसंबंधांनाही कुणाची तरी दृष्ट लागते. कोणती ना कोणती कारणं घडतात आणि मांजराच्या पावलानं दु:ख कळत नकळत त्याच्या आयुष्यात येते. होत्याचं नव्हतं होत... जीवनाचे रंग बदलतात... त्याची तीव्रताही हळूहळू कमी होत जाते... पण अचानक कधीतरी ती दुखरी जागा त्याच्या मनात उफाळून येते, जागृत होते... क्लेशकारक अनुभवातून जात असताना कवी एक निवेदक म्हणून अनुभव सांगतोय... त्यात अकारण भावविवशता किंवा ऊरबडवेपणा नाही आणि म्हणूनच श्याम तारे यांची ही कविता आपल्याला अधिकच भावते... अस्वस्थ करते...

**- डॉ. अनंत देशमुख**

ISBN : 978-93-92630-58-3
9789392630583
Price : ₹200